अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
अपिल क्र. ३०/२०१८
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ६७९६ दि. १८/१०/२०१८.

## अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/३०/२०१८

श्रीमती Qaneez-e-Fatemah Sukharani

रा. अ/३, हर्मिस ड्रोम. सी.एच.एस ली.
२११/३/१/ बी, विमाननगर पुणे ४११ ०१४

-------------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

### माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

श्रीमती **Qaneez-e-Fatemah Sukharani** रा. अ/३, हर्मिस ड्रोम. सी.एच.एस.ली., २११/३/१/ बी, विमाननगर पुणे ४११ ०१४ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि: २३.०८.२०१८ रोजी अर्ज करून **"Qaneez-e-Fatemah Sukharani यांचेकडून सन २०१४ पासून केलेल्या लोकशाही दिना बाबत"** एकूण ५ मुद्द्यावर माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत आस्थापना विभागाने जा. क्र. जमाअ/आस्था/ ५८०४ दि. १७.०९.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २३.०८.२०१८ | २३.०८.२०१८ | २१.०९.२०१८ | १७.०९.२०१८ | - |

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे उत्तरावर अपील क्र. ३०/२०१८ चा अपील अर्ज दि. ०१.१०.२०१८ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०१.१०.२०१८ | ०१.१०.२०१८ | १६.१०.२०१८ | होय. | - |

सदर प्रकरणी दि. १६.१०.२०१८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्रीमती **Qaneez-e-Fatemah Sukharani** रा. अ/३, हर्मिस ड्रोम. सी.एच.एस.ली. , २११/३/१/बी, विमाननगर पुणे ४११ ०१४ उपस्थित होते व **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा** यांचे प्रतिनिधी **श्री प्रकाश मोहिते हुद्दा अधीक्षक** हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी **श्रीमती Qaneez-e-Fatemah Sukharani** यांनी माझ्या अर्जातील मुद्दा क्र. १ व २ ची माहिती मला मिळाली आहे. परंतु मुद्दा क्र. ३, ४ व ५ या बाबतची माहिती मला मिळाली नाही असे नमूद केले तर **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा** यांचे प्रतिनिधी **श्री प्रकाश मोहिते** यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/ ५८०४ दि. १७.०९.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा** यांनी अपिलार्थी यांना त्यांचे मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४,५ ची माहिती**१०** दिवसात संबंधित विभागाकडून संकलित करून विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. तसेच जन माहिती अधिकारी, जनता संपर्क कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी अर्जदारांना दिलेली माहिती हि विहित नमुन्यामध्ये दिलेली नाही. ती यापुढे विहित नमुन्यामध्ये देण्याची दक्षता घ्यावी. अपिल क्र. ३०/२०१८ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका